संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ (मर्या.), मुंबई यांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता व्यवस्थापकीय अनुदान, ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) मंजूर करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन निर्णय, क्रमांक- चविम-२०१७/प्र.क्र.२८८/महामंडळे

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक :-३१ मार्च, २०१८.

वाचा :- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि.१८ एप्रिल,२०१७.

२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक : अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०.०६.२०१७

३) शासन निर्णय समक्रमांकित दि. २३.०८.२०१७.

४) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे पत्र क्र.लेखा/२०१७-१८/२७०४,दि.२१.०३.२०१८

शासन निर्णय :-

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ (मर्या.), मुंबई यांचेमार्फत चर्मकार समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येतात. या महामंडळास सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता व्यवस्थापन व प्रशासनावरील खर्च भागविण्याकरिता ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु.७९,१२,०००/- (अक्षरी रुपये एकोणऐंशी लक्ष बारा हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली होती. परंतु, सन २०१७-१८ च्या सुधारीत अंदाजामध्ये संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळास ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) याकरिताच्या अर्थसंकल्पिय तरतूदींमध्ये कपात करून रू. ६३,२९,०००/-(अक्षरी रुपये त्रेसष्ठ लक्ष एकोणतीस हजार फक्त) एवढी तरतूद निश्चित केली आहे .

२. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ (मर्या.), मुंबई या महामंडळास व्यवस्थापन व प्रशासनावरील खर्च भागविण्याकरिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पित तरतुदीपैकी संदर्भिय क्र.१ व २ नुसार एकूण मंजूर अनुदानाच्या ७०% च्या मर्यादेत संदर्भाधीन क्र. ०३ येथील शासन निर्णयान्वये रू.५५,३८,४००/- (रू. पंचावन्न लक्ष अडतीस हजार चारशे फक्त) एवढा निधी वितरीत केला आहे. आता सुधारित अंदाजास अनुसरून (रू.६३,२९,००० - रू.५५,३८,४००) एकूण रु.७,९०,६००/- (अक्षरी रुपये सात लक्ष नव्वद हजार सहाशे फक्त) एवढे सहायक अनुदान (वेत्तनेत्तर) वितरीत करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे :-

i) योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.

ii) व्यवस्थापनावरील खर्च मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने कामकाजात सुसूत्रता आणावी.

iii) विविध बाबींवर खर्च केलेल्या रकमांची तपशीलवार माहिती व त्यावर केलेला खर्च याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी.

iv) कार्यालयीन खर्चात काटकसर करावी.

v) महामंडळाने कर्जाच्या वसुलीचे प्रमाण प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करावेत.

vi) सदर योजनेचा निधी उपयोगिता प्रमाणपत्रे तपासण्याच्या अधीन वितरीत करण्यात येत आहे.

vii) सदरचा निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकारी नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन व वित्त विभागाने यापूर्वी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना व प्रचलित निकष , वित्तीय अधिकारांचे प्रत्यायोजन तसेच वित्त विभागाच्या दि.१८, एप्रिल,२०१७,दि.३०, जून,२०१७, दि.०८, ऑगष्ट,२०१७, दि.२९, जानेवारी,२०१८ व दि.०१, फेब्रुवारी, २०१८ व दि.०६.०२.२०१८ च्या परिपत्रकातील अटी व शर्तींचे व वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

३. उपरोक्त निधीचा खर्च करताना संबंधित अधिकाऱ्यांनी सर्वसाधारण वित्तीय नियम, योजनेच्या अटी व शर्ती, CVC मार्गदर्शक सूचना, CAG निरीक्षणे इ. अनुपालन करुन निधीचा विनियोग करावा.

४. संदर्भ क्र.१ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रकासोबतच्या तपासणी सूचीमध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक अटीची पुर्तता झाली आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

५. वरील अनुदानाबाबत सह सचिव/ उप सचिव (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम पुढील कार्यवाही करिता प्रादेशिक उपायुक्त, मुंबई समाजकल्याण, नवी मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ (मर्या.), मुंबई यांस संवितरित करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

६. या बाबींवरील खर्च "मागणी क्रमांक एन-३, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०१ अनुसूचित जातीचे कल्याण, ८०० इतर खर्च, (०९) (०३) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाला सहायक अनुदान (२२२५ ३५९२) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

७. हा शासन निर्णय, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७ नुसार तसेच या विभागाच्या अर्थसंकल्प शाखेच्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११३३४३३११२२ असा आहे.सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.03.31 13:35:41 +05'30'

(अ.कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सह सचिव/उप सचिव (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, कोकण भवन, नवी मुंबई (दोन प्रती)
४. व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ (मर्या.), मुंबई
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ /२, मुंबई/नागपूर.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई, / जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई,/ठाणे.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, नवी मुंबई.
९. वित्त विभाग, (का व्यय १४/अर्थोपाय/अर्थसंकल्प-३/साउ), मंत्रालय, मुंबई.
१०.सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५वा मजला, मुंबई,
११.कक्ष अधिकारी (का.अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१२.निवड नस्ती (का.महामंडळे)